सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०

# महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६

( दिनांक १५ जुलै, २००८ पर्यंत सुधारित )

# Maharashtra Act No. X of 2006

# Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006

*( As Modified upto the 15th July, 2008 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, यांच्याकडून भारतात मुद्रित व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित

२००९

[ **किंमत** : रुपये ६.०० ]

# महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६

## (सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०)

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. सार्वजनिक नाले, मलनिस्सारण मार्ग, नैसर्गिक किंवा मानवनिर्मित तलाव, खाडी, पाणथळ जमीन यांमध्ये विघटनशील आणि अविघटनशील कचरा टाकण्यास प्रतिबंध.

४. विवक्षित अविघटनशील पदार्थ, इत्यादींच्या वापरावर निर्बंध किंवा बंदी.

५. अविघटनशील कचरा ठेवण्यासाठी कुंड्यांची आणि तो टाकण्यासाठी विशिष्ट ठिकाणांची तरतूद करणे. तसेच, टाकाऊ पदार्थ गोळा करण्याची पद्धत निश्चित करणे.

६. अविघटनशील कचरा, इत्यादी गोळा करणे व टाकणे याबाबतचे मालकांचे व भोगवटादारांचे कर्तव्य.

७. अविघटनशील कचरा किंवा अविघटनशील पदार्थ हलवण्याचा स्थानिक प्राधिकरणाचा किंवा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.

८. प्रवेश करण्याचा आणि तपासणी करण्याचा अधिकार.

९. शास्ती.

१०. कंपन्यांनी केलेले अपराध.

११. अपराधांची संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करणे.

१२. अपराध आपसात मिटवणे.

१३. प्राधिकरण घटित करण्याचे, अधिकारी नियुक्त करण्याचे आणि निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

१४. अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

१५. अधिकार सोपवणे.

१६. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

१७. इतर कायद्यांवर परिणाम न होणे.

१८. नियम करण्याचा अधिकार.

१९. सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

अनुसूची

# सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

# महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २१ एप्रिल, २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन, पडीत जमीन, जलाशय, लोकांना दिसेल अशी जागा यांमध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी ; अविघटनशील पदार्थांचा वापर विनियमित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन, पडीत जमीन, जलाशय, लोकांना दिसेल अशी जागा यांमध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी ; अविघटनशील पदार्थांचा वापर विनियमित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी कायदा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ रोजी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६, प्रख्यापित केला होता ;

२००६ चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "विघटनशील कचरा" याचा अर्थ, सजीव प्राण्यांच्या क्रियेमुळे नष्ट होऊ शकणारा कचरा किंवा टाकाऊ पदार्थ, असा आहे ;

(ख) "सक्षम प्राधिकरण" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियुक्त केलेला कोणताही प्राधिकारी, अधिकारी किंवा व्यक्ती, असा आहे ;

(ग) " कचरा कुंडी " याचा अर्थ, कचरा अस्ताव्यस्त टाकणे, त्याठिकाणी रोगवाहक जंतूंचा प्रादुर्भाव व प्रसार होणे, मोकाट जनावरे फिरणे आणि अत्यंत दुर्गंधी निर्माण होणे यांस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, टाकाऊ पदार्थ गोळा करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी किंवा इतर कोणत्याही सोयीच्या ठिकाणी ठेवलेली सामाईक कुंडी, असा आहे ;

(घ) " घराची पन्हळ/पाणंद " याचा अर्थ, गटार म्हणून वापरण्यासाठी किंवा घाण वाहून नेण्यासाठी अथवा संडास, मुतारी, मलकुंडी किंवा घाण वा अन्य प्रदूषित पदार्थ टाकण्याची कुंडी यांची साफसफाई करण्यासाठी किंवा तेथील घाण हलवण्यासाठी नेमलेल्या माणसांना त्याठिकाणी ये-जा करण्यासाठी तयार केलेला, वेगळा ठेवलेला किंवा वापरला जाणारा बोळ किंवा अरूंदगल्ली, असा आहे ;

(ङ) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेली किंवा पुढे चालू ठेवलेली महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी, कटक मंडळ, ग्रामपंचायत, असा आहे ;

(च) " बाजार " यामध्ये, खरेदीदार व विक्रेते यांनी एकत्र येण्यासाठी आणि जागेच्या मालकाचे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींचे बाजारात चालणाऱ्या व्यवसायावर किंवा तेथे वारंवार येणाऱ्या व्यक्तींवर कोणतेही नियंत्रण असावे किंवा कसे याबाबत कोणताही सर्वसामान्य नियम नाही असे असतानाही, जेथे त्या जागेच्या मालकाच्या संमतीने किंवा संमतीशिवाय, मटण, मासे, फळे, भाज्या, अन्नपदार्थ किंवा माणसांना वापरण्यासाठी वा खाण्यासाठी असणाऱ्या अन्य कोणत्याही वस्तू वा पदार्थ मांडून विक्रीसाठी ठेवण्याकरिता व्यक्ती एकत्र जमतात अशा कोणत्याही जागेचा समावेश होतो ;

(छ) " अविघटनशील कचरा " याचा अर्थ, अविघटनशील पदार्थापासून तयार झालेला आणि सजीव प्राण्यांच्या क्रियेमुळे किंवा जीवशास्त्रीय नैसर्गिक प्रक्रियेने नष्ट होऊ न शकणारा आणि दीर्घकाळ पर्यावरणात राहणारा व परिसंस्थेला हानिकारक ठरू शकणारा कचरा किंवा टाकाऊ पदार्थ, असा आहे ;

(ज) " अविघटनशील पदार्थ " याचा अर्थ, सूक्ष्म जीवांच्या क्रियेमुळे, सूर्यप्रकाशामुळे किंवा इतर नैसर्गिक क्रियांमुळे ज्या पदार्थाचा नाश किंवा विघटन होऊ शकत नाही असा पदार्थ, असा आहे आणि त्यात या अधिनियमाच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या पॉलि-विनाईल-क्लोराईड (पी.व्ही.सी.), पॉली-प्रॉपिलीन आणि पॉलिस्टिरिन यांसारख्या पॉलिइथिलिन, नायलॉन किंवा इतर प्लास्टिक पदार्थांपासून तयार केलेल्या किंवा उत्पादन केलेल्या वस्तूंचा समावेश होतो ;

(झ) " भोगवटादार " यामध्ये—

(एक) ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भाडे देण्यात येत आहे किंवा देय आहे अशा जमिनीचे किंवा इमारतीचे असे भाडे किंवा अशा भाड्याचा कोणताही भाग मालकाला त्या त्या वेळी देत असलेली किंवा देण्यास जबाबदार असलेली अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) आपल्या जमिनीचा किंवा इमारतीचा ज्याच्याकडे कब्जा आहे किंवा जो तिचा अन्य प्रकारे वापर करत आहे असा मालक ;

(तीन) कोणत्याही जमिनीचा खंडमुक्त खंडकरी किंवा इमारतीचा भाडेमुक्त भाडेकरू ; आणि

(चार) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर आणि भोगवटा करताना होणाऱ्या नुकसानाची भरपाई मालकास देण्यास जबाबदार असणारी अशी कोणतीही व्यक्ती,—

यांचा समावेश होतो ;

(ञ) " मालक " यामध्ये, जी व्यक्ती कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे, स्वतःच्या नावाने किंवा इतर व्यक्तीच्या नावाने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीची एजंट, विश्वस्त, पालक किंवा प्रापक म्हणून त्यात्या वेळी स्वीकारत असेल किंवा स्वीकारण्यास हक्कदार असेल अशा व्यक्तीचा अथवा जमीन किंवा इमारत किंवा तिचा भाग भाडेकरूला भाड्याने दिला असता तर, ज्या व्यक्तीला असे भाडे मिळाले असते किंवा जी असे भाडे स्वीकारण्यास हक्कदार असती अशा व्यक्तीचा, समावेश होतो ;

(ट) " जागा " याचा अर्थ, कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भाग, असा आहे आणि त्यामध्ये, एखाद्या इमारतीला किंवा इमारतीच्या भागाला लागून कोणतीही बाग, मोकळी जागा आणि नोकरघरे असल्यास, त्यांचा समावेश होतो ;

(ठ) " लोकांना दिसेल अशी जागा " यामध्ये, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या किंवा तेथून जाणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीस पडेल अशी कोणतीही खाजगी जागा किंवा इमारत, स्मारक, कुंपण किंवा सज्जा यांचा समावेश होतो ;

(ड) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

१९८६ (ढ) " सार्वजनिक विश्लेषक " याचा अर्थ, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम,
चा २९. १९८६ याच्या तरतुदींअन्वये राज्यात स्थापना केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही पर्यावरणीय प्रयोगशाळेच्या संबंधात शासकीय विश्लेषक म्हणून नियुक्त केलेली किंवा मान्यता दिलेली व्यक्ती, असा आहे ;

(ण) " सार्वजनिक जागा " याचा अर्थ, सार्वजनिक वापरासाठी आणि वहिवाटीसाठी खुली असणारी अशी कोणतीही जागा, असा आहे आणि त्यात मार्ग, रस्ता, बाजार, घराची पन्हळ/पाणंद किंवा वाट यांचा—मग ते रहदारीचे असोत किंवा नसोत यांचा आणि जेथे लोकांना प्रवेश करण्यासाठी मान्यता दिलेली आहे किंवा जेथे थांबण्याचा लोकांना अधिकार आहे किंवा ज्यावरून त्यांना ये-जा करण्याचा अधिकार आहे असे प्रवास स्थानक/थांबा (लॅन्डिंग प्लेस) यांचा समावेश होतो ;

(त) " मानके " याचा अर्थ, शासनाने या अधिनियमाखालील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेली मानके किंवा पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ याखाली विहित केलेली मानके, असा आहे; १९८६ चा २९.

(थ) " पाणथळ जमीन " यामध्ये, सागरकिनारे, खारफुटी (मॅनग्रोव्ह), पडीत जमिनी व खाड्या तसेच त्यांच्या जवळील दलदलीच्या जमिनी, चिबड राने (मार्शेस), गवताळ पाणथळ जमिनी तसेच खळग्याच्या जमिनी, नदीमुखे, त्रिभुजप्रदेश व ओहोटी मैदाने (टायडल फ्लॅट्स) आणि मानवनिर्मित मत्स्यतळी, भातखाचरे, जलाशय व मिठागरे, यांचा समावेश होतो.

**सार्वजनिक नाले, मलनिस्सारण मार्ग, नैसर्गिक किंवा मानवनिर्मित तलाव, खाडी, पाणथळ जमीन यांमध्ये विघटनशील आणि अविघटनशील कचरा टाकण्यास प्रतिबंध.**

**३.** (१) कोणतीही व्यक्ती, स्वतः किंवा इतर व्यक्तीमार्फत जाणूनबुजून किंवा अन्यप्रकारे, खाजगी किंवा सार्वजनिक निस्सारण बांधकामांशी जोडलेल्या कोणत्याही नाल्यामध्ये, धुराडे, नळमार्ग किंवा जोडण्या यांमध्ये, नैसर्गिक किंवा मानवनिर्मित तलावामध्ये, पाणथळ जमिनीमध्ये, ज्यामुळे—

(एक) निस्सारणाला व मलनिस्सारण यंत्रणेला हानी पोहोचू शकेल ;

(दोन) नाल्यांमधील किंवा मलनिस्सारण यंत्रणेतील वाहत्या प्रवाहाला अडथळा येऊ शकेल किंवा त्यातील सांडपाण्यावर वा मलप्रवाहावर करावयाच्या प्रक्रियेस आणि विल्हेवाटीस बाधा पोहोचू शकेल ;

(तीन) सार्वजनिक आरोग्यास घातक, उपद्रवकारक किंवा बाधक ठरू शकेल ; आणि

(चार) तलाव, नदी, पाणथळ जमीन यांना नुकसान पोहोचू शकेल,

असा कोणताही अविघटनशील कचरा किंवा बांधकामातील दगड-माती किंवा कोणताही विघटनशील कचरा अविघटनशील पिशवीमध्ये किंवा पेटीमध्ये घालून टाकणार नाही किंवा टाकू देणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, जाणूनबुजून किंवा अन्य प्रकारे,—

(क) कचराकुंडीमध्ये ठेवलेला कचरा ; किंवा

(ख) अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नेमलेल्या क्षेत्रांवर अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाने नेमून दिलेल्या ठिकाणी साठवलेला कचरा

वगळता, कोणताही विघटनशील किंवा अविघटनशील कचरा, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीला अनुसरून असल्याखेरीज आणि विहित करण्यात येतील अशा संरक्षक उपाययोजनांचे अनुपालन केल्याखेरीज, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा लोकांना दिसेल अशा जागी टाकणार नाही किंवा टाकू देणार नाही.

**विवक्षित अविघटनशील पदार्थ, इत्यादींच्या वापरावर निर्बंध किंवा बंदी.**

४. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या, व राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा मानकांच्या विरुद्ध असलेल्या अविघटनशील पदार्थांचा, किंवा अन्य कोणत्याही पदार्थांचा राज्यामध्ये वापर करण्यावर निर्बंध किंवा बंदी घालता येईल.

(२) राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या किंवा अशा वस्तूंचा वापर करणाऱ्या उत्पादकांवर, वितरकांवर आणि अन्य व्यक्तींवर आवेष्टनसामग्रीचा प्रकार, आकार, जाडी, त्यावरील खूणचिठ्ठी आणि त्यातील घटकद्रव्ये यांसंबंधात आवेष्टनसामग्रीचा वापर व विल्हेवाट, तसेच पदार्थाची विघटनशीलता व पुनर्वापर करणे यासंबंधातील मानके वा प्रमाणक तत्त्वे यांबाबत अटी (अत्यावश्यक बाबी) लादता येतील.

**अविघटनशील कचरा ठेवण्यासाठी कुंड्यांची आणि तो टाकण्यासाठी विशिष्ट ठिकाणांची तरतूद करणे. तसेच, टाकाऊ पदार्थ गोळा करण्याची पद्धत निश्चित करणे.**

५. स्थानिक प्राधिकरणाचे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचे पुढील कर्तव्य असेल :—

(क) अविघटनशील कचरा तात्पुरता टाकण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी योग्य व सोईस्कर ठिकाणी सार्वजनिक कचराकुंड्या ठेवणे, आगारे किंवा ठिकाणे निश्चित करणे किंवा त्यांची तरतूद करणे ;

(ख) विघटनशील कचरा टाकण्यासाठी ठेवलेल्या आणि त्यासाठीच ठेवलेल्या कुंड्यांव्यतिरिक्त, अविघटनशील कचरा तात्पुरता टाकण्यासाठी स्वतंत्र कचरा-कुंड्या पुरविणे ;

(ग) कचराकुंड्यांतील, आगारातील आणि खंड (क) अन्वये त्याने तरतूद केलेल्या किंवा निश्चित केलेल्या सर्व ठिकाणांमध्ये साठलेला कचरा हलविणे ; आणि

(घ) अशा प्रकारे गोळा केलेल्या अविघटनशील कचऱ्याचा पुनर्वापर करण्याची व्यवस्था करणे.

**अविघटनशील कचरा, इत्यादी गोळा करणे व टाकणे याबाबतचे मालकांचे व भोगवटादारांचे कर्तव्य.**

६. प्रत्येक जमिनीच्या व इमारतीच्या मालकांचे व भोगवटादारांचे पुढील कर्तव्य असेल :—

(एक) आपापल्या जमिनीवरील व इमारतीमधील अविघटनशील कचरा गोळा करणे वा गोळा करण्याची व्यवस्था करणे आणि त्या क्षेत्राच्या स्थानिक प्राधिकरणाने अविघटनशील कचरा तात्पुरता टाकण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी पुरवलेल्या कचराकुंड्या, आगारे वा विशिष्ट जागा यांमध्ये कचरा टाकणे वा टाकण्याची व्यवस्था करणे ;

(दोन) जमिनीवरील व इमारतीमधील सर्व प्रकारचे अविघटनशील टाकाऊ पदार्थ गोळा करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या अधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारे आणि रीतीने विघटनशील कचरा गोळा करण्यासाठी ठेवलेल्या व वापरल्या जाणाऱ्या कचराकुंड्या व कचरापेट्या यांच्या व्यतिरिक्त, स्वतंत्र कचराकुंड्या पुरवणे आणि अशा कचराकुंड्या किंवा कचरापेट्या सुस्थितीत ठेवणे ;

(तीन) त्यांच्याकडून निर्माण होणारे टाकाऊ पदार्थ, किमान दोन स्वतंत्र कचराकुंड्यां-मध्ये, म्हणजे, एक विघटनशील टाकाऊ पदार्थांसाठी व दुसरी अविघटनशील टाकाऊ पदार्थांसाठी, असे वेगळे ठेवणे व साठवणे.

अविघटनशील कचरा किंवा अविघटनशील पदार्थ हलवण्याचा स्थानिक प्राधिकरणाचा किंवा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.

७. स्थानिक प्राधिकरणास किंवा सक्षम प्राधिकरणास, ज्यामुळे उपद्रव निर्माण होण्याची शक्यता आहे किंवा मलनिस्सारण व सांडपाणी निस्सारण व्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे किंवा जीवाला व आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे असा अविघटनशील कचरा किंवा अविघटनशील पदार्थ अनधिकृतरीत्या साठवण्याची वा टाकण्याची जागा बनलेल्या कोणत्याही जमिनीच्या वा इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला, किंवा अंशतः मालक असणाऱ्या व्यक्तीला किंवा तिचा मालक किंवा अंशतः मालक असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीला लेखी नोटीस देऊन त्यानंतर, अशाप्रकारे साठवलेला वा गोळा केलेला कचरा वा पदार्थ हलवता येतील किंवा हलवण्याची व्यवस्था करता येईल किंवा त्याला आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करता येतील ; आणि कलम ८, पोट-कलम (५) अन्वये तरतूद केलेल्या रीतीने, त्या व्यक्तीच्या खर्चाने त्या कचऱ्याची वा पदार्थांची विल्हेवाट लावता येईल.

प्रवेश करण्याचा आणि तपासणी करण्याचा अधिकार.

८. (१) राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीत अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, सर्व वाजवी वेळी तिला आवश्यक वाटेल अशा सहाय्यासह कोणत्याही जागेत पुढील प्रयोजनांसाठी प्रवेश करण्याचा अधिकार असेल :—

(एक) राज्य शासनाने तिच्याकडे सोपविलेली कोणतीही कामे पार पाडणे ; किंवा

(दोन) अशी कोणतीही कामे पार पाडावयाची आहेत किंवा कसे आणि असल्यास, ज्या रीतीने ती पार पाडावयाची ती रीत अथवा या अधिनियमाच्या वा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदी, किंवा या अधिनियमान्वये बजावण्यात आलेली कोणतीही नोटीस, काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा देण्यात आलेला कोणताही निदेश यांचे अनुपालन करण्यात येत आहे किंवा आले आहे किंवा कसे हे निर्धारित करणे ; किंवा

(तीन) एखाद्या इमारतीमध्ये या अधिनियमाखालील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांखालील एखादा अपराध घडला आहे किंवा घडत आहे किंवा घडण्याची शक्यता आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, त्या इमारतीचा, कोणताही अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा अन्य कोणतीही महत्त्वाची वस्तू यांची तपासणी करणे किंवा त्या इमारतीची झडती घेणे आणि असा अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा इतर महत्त्वाची वस्तू, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या अन्वये शिक्षापात्र असणारा एखादा अपराध घडला असल्याचा पुरावा ठरू शकेल असे त्यास सकारण वाटत असेल तर, ते जप्त करणे.

(२) कोणताही अविघटनशील पदार्थ किंवा अविघटनशील कचरा यांची व्यवस्था पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान केलेल्या किंवा त्या पोट-कलमान्वये कामे पार पाडणाऱ्या व्यक्तीस सर्वतोपरी सहाय्य देणे बंधनकारक असेल आणि कोणत्याही वाजवी कारणाशिवाय किंवा सबबीशिवाय तिने तसे करण्यात कसूर केली तर, या अधिनियमान्वये ती शिक्षेस पात्र असेल.

(३) कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिचे काम पार पाडताना जाणूनबुजून विलंब केल्यास किंवा त्यात अडथळा आणल्यास, ती या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असेल.

१९७४ चा २. (४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी या, उक्त संहितेच्या कलम ९४ अन्वये काढलेल्या अधिपत्राखाली मिळालेल्या प्राधिकारान्वये घेण्यात येणाऱ्या कोणत्याही झडतीस किंवा आणल्या जाणाऱ्या कोणत्याही जप्तीस जशा व जेथवर लागू होतात तशा व तेथवर, त्या या कलमान्वये घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही झडतीस किंवा आणल्या जाणाऱ्या कोणत्याही जप्तीस लागू होतील.

(५) या कलमान्वये जप्त केलेला कोणताही अविघटनशील कचरा किंवा अविघटनशील पदार्थ यांची विहित करण्यात येईल अशा रीतीने विल्हेवाट लावण्यात येईल.

**९.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे, काढण्यात आलेल्या अधिसूचनेचे किंवा आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर,— **शास्ती.**

(क) पहिल्या अपराधासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(ख) दुसऱ्या अपराधासाठी, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(ग) त्या नंतरच्या अपराधासाठी, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखालील एखादा अपराध घडण्यास कोणत्याही रीतीने, सहाय्य करीत असेल, अपप्रेरणा देत असेल किंवा सहायक ठरत असेल ती व्यक्ती, अपराध सिद्ध झाल्यावर, असा अपराध करण्याबद्दल तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र असेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

१०. (१) या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करणारी व्यक्ती ही, एखादी कंपनी असेल तर, तो अपराध घडतेवेळी, जी त्या कंपनीची प्रभारी होती आणि त्या कंपनीचे कामकाज पार पाडण्यास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीदेखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कारवाई करण्यास व त्यानुसार शिक्षा देण्यास ती पात्र असेल :

परंतु, हा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा हा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व खबरदारी घेतली होती, असे त्या व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव अथवा अन्य कोणताही अधिकारी याच्या संमतीने वा मूकानुमतीने किंवा त्याने केलेल्या कोणत्याही अक्षम्य हयगयीमुळे हा अपराध झाला असल्याचे सिद्ध झाले असेल, त्याबाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, सचिव अथवा अन्य अधिकारी हा देखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा देण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(एक) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्था अथवा व्यक्तींचा अन्य संघ याचा अंतर्भाव होतो ; आणि

(दोन) भागीदारी संस्था या संदर्भात "संचालक" याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

**अपराधांची संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करणे.**

११. या अधिनियमाखालील सर्व अपराधांची, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या किंवा महानगर दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या न्यायालयाकडून संक्षिप्त न्यायचौकशी करण्यात येईल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी, शक्य तेथवर अशा न्यायचौकशीला लागू असतील. १९७४ चा २.

**१२.** (१) राज्य शासनाने किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, जिने या अधिनियमाखालील अपराध केला आहे किंवा जिच्यावर या अधिनियमाखालील पहिला वा दुसरा अपराध केल्याचा वाजवी संशय आहे अशा कोणत्याही व्यक्तीकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रक्कम स्वीकारता येईल :—

**अपराध आपसात मिटवणे.**

तक्ता

| अनुक्रमांक | उल्लंघन/अपराध | अपराध आपसात मिटविण्याबद्दल स्वीकारावयाची रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | पहिला अपराध .. | पाच हजार रुपये |
| २ | दुसरा अपराध .. | दहा हजार रुपये. |

(२) पोट-कलम (१) ला अनुसरून रक्कम भरल्यावर, त्या अपराधासाठी ताब्यात घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीला मुक्त करण्यात येईल आणि अशा व्यक्तीविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयामध्ये कोणतीही कार्यवाही दाखल केली जाणार नाही किंवा चालवली जाणार नाही.

(३) पोट-कलम (१) ला अनुसरून, एखादा अपराध आपसात मिटविण्याकरिता रक्कम स्वीकारणे हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ३०० च्या अर्थांतर्गत दोषमुक्ती असल्याचे मानण्यात येईल.

१९७४ चा २.

**१३.** (१) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्या आदेशात नमूद करण्यात येतील अशा या अधिनियमाखालील राज्य शासनाच्या अधिकारांचा वापर करण्याच्या आणि अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने अथवा नावांनी एक वा अनेक प्राधिकरणे घटित करता येतील.

**प्राधिकरण घटित करण्याचे, अधिकारी नियुक्त करण्याचे आणि निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार.**

(२) राज्य शासनास या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कार्ये पार पाडताना, कोणत्याही अधिकाऱ्यास वा प्राधिकरणास लेखी निदेश देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करणे हे त्या अधिकाऱ्यावर वा प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदींना बाध न आणता, राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या विशेष वा सर्वसाधारण आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटेल असे पदनाम असलेले अधिकारी पदनिर्देशित करता येतील, आणि त्यास योग्य वाटतील असे, या अधिनियमाखालील अधिकार व कार्ये त्यांच्याकडे सोपविता येतील.

**अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.** **१४.** (१) अनुसूचीतून कोणतीही नोंद वगळणे किंवा तीत कोणतीही नोंद समाविष्ट करणे किंवा अशा कोणत्याही नोंदीमध्ये सुधारणा करणे लोकहिताच्या दृष्टीने इष्ट असेल तर, राज्य शासनास, सार्वजनिक विश्लेषकाशी विचारविनिमय करून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तसे करता येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर, ती अनुसूची तदनुसार सुधारण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**अधिकार सोपवणे.** **१५.** राज्य शासनास, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून असा निदेश देता येईल की, नियम करण्याचा अधिकार वगळून या अधिनियमान्वये त्याने वापरण्याजोगा असलेला कोणताही अधिकार हा, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला वापरता येईल.

**सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.** **१६.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये वा दिलेल्या निदेशांन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासनाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**इतर कायद्यांवर परिणाम न होणे.** **१७.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना न्यूनकारी नसतील तर, त्या भर म्हणून असतील.

**नियम करण्याचा अधिकार.** **१८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) पहिल्या वेळी नियम करण्यात येत असतील ते खेरीज करून, या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम हे, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांमध्ये पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) जे उत्पादक, वितरक आणि अन्य व्यक्ती, वस्तू तयार करतात किंवा त्या हाताळतात त्यांच्यावर कलम ४, पोट-कलम (२) अन्वये, आवेष्टन सामग्रीचा प्रकार, आकार, जाडी, त्यावरील खूणचिट्ठी आणि त्यातील घटकद्रव्ये याबाबतीत आवेष्टनसामग्रीचा वापर आणि विल्हेवाट तसेच पदार्थाची विघटनशीलता व पुनर्वापर करणे यासंबंधातील मानके व प्रमाणक तत्त्वे यांबाबतीतील अत्यावश्यक बाबी किंवा अटी निर्धारित करणे ; आणि

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी विहित करण्यात येईल किंवा विहित करणे आवश्यक असेल अशी इतर कोणतीही बाब.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना त्या एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांमध्ये मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमामध्ये कोणताही फेरबदल करण्याबाबत किंवा तो करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि तशा आशयाचा त्यांचा निर्णय त्यांनी **राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

२००६ चा महा. अध्या. ४.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.**

**१९.** (१) महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, (काढण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनेसह किंवा आदेशासह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

[ कलम २(ज) आणि १४ पहा ]

**अविघटनशील व विघटनशील कचरा किंवा पदार्थ, इलेक्ट्रॉनिक टाकाऊ पदार्थ**

(एक) ॲसिटिल.

(दोन) ॲक्रेलिक.

(तीन) सॅल्युलोज ॲसिटेट.

(चार) सॅल्युलोज ॲसिटेट ब्युटिरेट.

(पाच) बांधकामातील दगड-माती.

(सहा) इलेक्ट्रॉनिक टाकाऊ पदार्थ.

(सात) हिप्स (एच.आय.पी.एस.).

(आठ) नायलॉन.

(नऊ) आवेष्टनाकरिता वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या पट्ट्या.

(दहा) पॉलिकार्बोनेट.

(अकरा) पॉलिइथिलिन.

(बारा) पॉलिइथिलिन टेरेप्थॅलेट (पी.ई.टी.).

(तेरा) पॉलिप्रॉपिलिन.

(चौदा) पॉलिस्टिरिन.

(पंधरा) पॉलि-विनाइल-क्लोराईड (पी.व्ही.सी.).

(सोळा) थर्मोकोल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई